Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad-431004 Maharashtra (India)
NAAC Re-Accredited A

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे "अ" दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.net
http://bamua.digitaluniversity.ac.
E-Mail : coe@bamu.net

Office of the Director
Board of Examinations & Evaluation
कार्यालय, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र परीक्षा/कापवमूमं/२०१७/ दिनांक : ०९.११.२०१७

# जाहीर आवाहन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षांचे नोव्हेंबर/डिसेंबर, २०१७ मध्ये आयोजन करण्यात आले आहे. या परीक्षेस बसणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना, परीक्षार्थीना व पालकांना हार्दिक शुभेच्छा !

या परीक्षांनंतर विद्यार्थ्यांच्या जीवनाला एक नवी दिशा मिळणार असून एक नवे पर्व सुरु होत आहे, त्यासाठी माझ्या तर्फे व विद्यापीठाच्या वतीने त्यांच्या पुढील वाटचालीस लाख-लाख शुभेच्छा...!!

परीक्षेच्या निमित्ताने सर्व संबंधितांना आवाहन करण्यात येते की, परीक्षेच्या आयोजनाची सामुहिक जबाबदारी असून या कार्यात सर्वांचे सहकार्य अपेक्षीत आहे. विद्यार्थी हा महाविद्यालय व विद्यापीठाचा दुवा आहे. त्यामुळे परीक्षेचे पावित्र्य राखण्याची जबाबदारी विद्यापीठ, महाविद्यालयासोबतच विद्यार्थ्यांचीही आहे, याचे भान विद्यार्थ्यांनी राखायला हवे. त्यास्तव कोणत्याही विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब करु नये असे आवाहन याद्वारे विद्यार्थ्यांना करण्यात येत आहे.

सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्य व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आवाहन करण्यात येते की, परीक्षेचे कार्य अधिक पारदर्शी व सुरळीत पार पाडणेसाठी सर्वांनी सामुहिक जबाबदारी पार पाडावी.

परीक्षेच्या निकालावर विद्यार्थ्यांचे पुढील भवितव्य अवलंबून आहे. त्यामुळे परीक्षेच्या कामात अधिक सतर्कता बाळगण्यात यावी व परीक्षेचे कार्य पार पाडावे.

पून्हा एकदा सर्वांना खुप-खूप शुभेच्छा !

9/11/17

डॉ. दिगंबर एम. नेटके
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ